Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 5, December 2023; Pages 30 – 34

DOI: 10.5281/zenodo.10072317

Original Research Article

# महात्मा गांधीं आणि भारतीय स्वतंत्र संग्राम

प्रा. डॉ. दत्ता उद्धव जाधव

विभाग प्रमुख व मार्गदर्शक, इतिहास विभाग, श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, माहूर जि. नांदेड ४३१७२१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: Jadhavdu24@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 22 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

संयुक्त भारत पृथ्वीचा तो प्रचंड भूभाग जो त्याच्या सभ्यता, संस्कृती आणि चांगल्या आचरणाने सुशोभित होता. या अखंड भारतावर प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक आक्रमण झाले. काहीनी आक्रमणानंतर येथील अफाट संपत्ती लुटून नेली. तर काहींनी भारतात आपले साम्राज्य निर्माण केले. इंग्रज व्यापाराच्या उद्देशाने भारतात आले. इथे त्यांनी आपले पाय रोवायला सुरुवात केली. मग त्याने राजकीय साम्राज्य निर्माण केले. भारतीयांना त्यांचे गुलाम बनवले. भारत हा पृथ्वीचा असा एक भाग आहे जो गुलामगिरीच्या अंधाराखाली सर्वात जास्त काळ राहिला आहे. ज्याच्या नशिबी गुलामी नंतर गुलामगिरी राहिली. गुलामगिरीविरुद्धचे पहिले भारतीय बंड १० मे १८५७ रोजी झाले. सन १८५७ उठाव म्हणजे पहिल्यांदा स्वतंत्र्यांचा बिगुल वाजला होता. या उठावात ब्रिटिश विरोधात भारतीयांच्या मनात प्रचंड आक्रोश जाणवला होता. अशा आवाजाने ब्रिटिश राजवटीची पाळेमुळे हादरली आणि कर्णधारांची झोप उडाली होती. भारतीयांची एकता मुळे इंग्रजांना काळजी वाटू लागली. याचा सामना करण्यासाठी नवीन शस्त्राचा वापर ब्रिटिश सरकारकडून करण्यात आला. तो म्हणजे फोडा आणि राज्य करा. इंग्रजांनी संमत केलेल्या इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट अंतर्गत डिव्हाईड अँड रुल इंडियाला स्वातंत्र्य मिळाले, जो प्रत्यक्षात स्वातंत्र्य कायदा नसून डिव्हिजन ऑफ इंडिया कायदा होता. असंही म्हणता येईल. धर्माच्या नावावर मोहमद जिना यांचे टू नेशन थिअरी स्वीकारून अखंड भारताचा हिंदुस्थान आणि पाकिस्तान झाला, यामुळे नियोजित आणि अनियोजित अनपेक्षित असा रक्तरंजित नंगा नाच सुरू झाला. बलात्कार, खून आणि लज्जास्पद रक्तरंजित संघर्ष हिन्दू आणि मुस्लिम लोकांत झाला. लोक जीव हातात घेऊन पळू लागले. पृथ्वीच्या कोणत्या भागाला स्वातंत्र्य मिळाले हे त्यांना माहीत नव्हते. पाकिस्तानातील निर्वासित हिंदूं रेल्वे गाड्यांमध्ये भरून भारताच्या दिशेने निघाले. ट्रेन धावत होती पण त्यावर स्वार झालेले लोक इतके घाबरले होते की, ट्रेनमध्ये बसूनही ते ट्रेनपेक्षा वेगाने धावत होते. लहान मुले व वृद्ध लोक भुकेने मरत होते. पादचाऱ्यांची अवस्था बिकट

होती. ३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजी एका प्रार्थना सभेला निघाले होते, आणि त्याचवेळी त्यांच्यावर नथुराम गोडसे यांनी गोळया झाडून हत्या केली.

महात्मा गांधींघे भारतीय स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य अतुल्य आहे. भारतीय राजकीय विचारवंतांच्या विचारसरणी पेक्षा त्यांची विचारसरणी वेगळी सत्याग्रह आणि अहिंसा वर आधारित होती. आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गाँधीचे स्थान वेगळे होते.भारती भारतीय स्वतंत्र चळवळीत त्यांनी जी लढ्याची पद्धति वापरली व जे योगदान दिले. त्याला इतिहासात तोड नाही. महात्मा गाँधी यांचे १९२० ते १९४७ या कालखंडात राष्ट्रीय काँग्रेस सभेच्या कार्यवर प्रभाव होता. सत्य, अहिंसा वसत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्य विरुद्ध लढा दिला. हा मानवजातीच्या इतिहासातील अपूर्व लड़ा मानवा लागेल. महात्मा गाँधींचा जन्म २ अक्टूबर १८६९ ला पोरबंदर येथे झाला. प्राथमिक व माध्यमिक पोरबंदर येथे झाले. कस्तूरबा गाँधी सोबत विवाह झाला. इंग्लंडला बैरिस्टर ही सर्वोच्च पदवी संपादन केली. भारतात परतल्यावर मुंबई व राजकोट येथे वकील सुरु केली. महात्मा गांधीनी दक्षिण अफ्रिकेतील हिंदी लोकांवरील इंग्रज लोकांनी केलेल्या अन्याय विरोधात आंदोलन केले. गांधीनी भारतात ब्रिटिश विरुद्ध सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह मार्गाने अनेक आंदोलने केली. यात असहकार, सविनय कायदेभंग, चलेजाव चळवळी होत्या. महात्मा गाँधीचे जीवनचरित्र हेच आदर्श तत्वज्ञान होते. ते राजकीय संत होते. महात्मा गांधीच्या तत्वज्ञानाचा पाया सत्यावर आधारित आहे. सत्य व अहिंसा हे दोन्ही तत्वे परस्परांना पुरक आहेत. सत्य हे साध्य व अहिंसा ही साधन आहे. असे स्पष्टीकरण ते देतात. सत्य ही जीवनातील एक आदर्श संकल्पना आहे. सत्याचा ठिकाणीच परमेश्वराचे अधिष्ठान असते. प्रृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही वस्तुमानाला व प्राणीमानाला विचारांने, शब्दाने आणि कृत्याने संभवनारी दुखापत टाळणे म्हणजे अहिंसा होय. महात्मा गांधीजींच्या सत्याच्या प्रयोगात्मक अहिंसेच्या तत्वाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. दिलेली देणगी आहे. गांधीजींच्या मते सत्याग्रह हा प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. इतर सर्व मार्ग संपल्यावर या मार्गाचा अवलंब करावा. सत्याग्रह या चळवळीला धर्माचे अधिष्ठान आहे. सत्याग्रहचे वर्णन गांधीजीनी शांततामय बंड असे केले आहे. सत्य व अहिंसेच्या साह्याने दृष्ट प्रवृत्तीशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह होय.प्रस्थापित कायद्याच उघडपणे किंवा सामुदायिकरीत्या भंग करणे हे त्याच्या कार्यक्रमाचे प्रमुख अंग होते. सत्याग्रहाचे पहिले तत्व म्हणजे सत्याचा शोध घेताना शत्रुशी वागताना हिंसेचा अवलंबन करू नये. तर सहानुभूतीपूर्वक त्याला चुकांपासून परावृत्त करावे. सत्य व अहिंसा या दोन्ही तत्वाचा मिलाफ म्हणजे सत्याग्रह होय.

महात्मा गांधीनी ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात असहकार चळवळ सुरू केले. शासनाच्या कोणत्याही कामाला सहकार्य करू नये. यामुळे शासनाचे मन वळविता येते. अशी गांधीजींची धारणा होती. जनतेचे सहकार्य नसेल तर कोणती शासन चालत नाही? म्हणून. जनतेने भारतातील ब्रिटिश सरकारच्या शासनास कोणतेही सहकार्य करू नये. अशी भूमिका त्यांनी घेतली. शासनाने केलेले .जुलूम नष्ट करण्यासाठी असहकार हे अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. महात्मा गांधीनी ब्रिटिश शासनाच्या विरोधात सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. सरकारी कायदे, नियम, आज्ञा न पाळणे. सरकारचे कायदे न पाळणे म्हणजे कायदेभंग. कायदा नाकारून त्यासाठी दिलेली शिक्षा न डगमगता भोगणे म्हणजे. सविनय कायदेभंग. गांधीजीनी सविनय कायदेभंगाची सुरुवात मिटाच्या कायद्या नाकारून केली होती. गांधींनी खेड्यातील आर्थिक प्रगतीसाठी स्वदेशी या चळवळीचा उपयोग केला. आर्थिक व आधुनिक घटनेवर संस्कृतीचा पाया अवलंबून असते आणि

त्यासाठी. स्वदेशीला त्याने मत दिले. खादी ग्रामोद्योग सुरू करण्यास त्याने प्रोत्साहन दिले. सर्वांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करावा त्यासाठी खेड्यापाड्यापासून निरनिराळे उद्योग सुरू करावे. स्वदेशी चळवळ म्हणजे भारतीय कारागिरांनी तयार केलेल्या वस्तू वापरणे आणि परकीय वस्तूला नाकारणे. म्हणजे? परकीय वस्तु न घेता त्यांना आर्थिक सहकार्य न करणे. महात्मा गांधीने हडताल या मार्गाचा उपयोग केला होता. कामधंद्यावर बहिष्कार घालणे. काम बंद पाडणे. कामगार, विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी यानी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध या तंत्राचा वापर करावा. असे गांधीनी सुचवले होते. प्रत्येक व्यक्तीने स्वेच्छेने व उत्स्फूर्तपणे व्यवहार बंद ठेवले पाहिजे. तो पुन्हा पुन्हा करायचा नसतो कारण त्यामुळे जनजीवन विकसित होते. त्यामुळे जनतेच्या पाठिंबा मिळवण्यासाठी एवढ्यापुरता तो मर्यादित ठेवायचा होता म्हणून हरताळ हे जास्त प्रमाणामध्ये शहरातील मोठ्या मोठ्या कंपनीच्या कामगाराने सुरुवात केली होती. विशेष म्हणजे कामगारांसाठी हडताल ही चळवळ महात्मा गांधींनी सुरू केली. महात्मा गांधींनी प्रत्येक. समाजातील, जातीतील, धर्मातील, वर्गातील. गटाचे लोकांना राजकीय स्वातंत्र्यलढ्यासाठी शामिल होता येतील. यासाठी वेगवेगळया चळवळी सुरू केले होते. कामगाराना हरताळसारखे आंदोलन, शेतकर्यांना स्वदेशी सारखे आंदोलन, कर्मचार्यांना कायदेभंगाचे आंदोलन, राजकीय पुढार्यांना असहकार आंदोलन, तसेच साधुसंताना बहिष्कार करण्याचा आंदोलन अशा प्रकारे भारतातील प्रत्येक व्यावसायिक नागरिकांना गांधीजीनी आपल्या पद्धतीने ब्रिटिश विरूद्धच्या चळवळीत सहभागी करून घेतले होते. महात्मा गांधीनी स्वतंत्र चळवळीसाठी जी साधने वापरले होते, त्यामुळे ब्रिटिशांना प्रशासन करणे अशक्य व्हावे हा उद्देश होता.

महात्मा गांधीनी स्वातंत्र्य चळवळीसाठी ज्या तत्त्वज्ञान वापर केला होता. ते सर्व तत्वे. त्याने स्वताहून सुरू केली होती. भारतातील इतर नेत्यांपेक्षा तो सामान्य जनतेत जास्त प्रभावित झाला. कोणाच्याही दबावाखाली आपले तत्वज्ञान, विचारसरणी, सोडले नाही. भारतीय सामान्य जनतेला अंग झाकण्यासाठी वस्त्र नाहीत. असे लक्षात आल्यानंतर. त्यांनी स्वताच्या अंगावर धोतर आणि शेला वापर केला. या आचरणामुळे तो सामान्य माणसाच्या मनात स्थान मिळवले. त्याने प्रत्येक धर्माच्या लोकांची समस्या समजून घेत होता. आणि त्याना सहकार्य करण्याचा पूर्ण प्रयत्न करीत होता. त्यामुळे तो लोकप्रिय होत गेला. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली खिलाफत चळवळ सुरू केली. म्हणून महात्मा गांधीच्या प्रत्येक चळवळीमध्ये. सर्व जाती धर्माचे लोक सहभागी झाले होते. महात्मा गांधीनी काँग्रेस पक्षाचे अनेक अधिवेशन घेतले. अधिवेशनामध्ये वेगवेगळया चळवळी विषयी ठराव मांडला जात होता. आणि त्या ठरावानुसार चळवळीचे कार्य सुरू होत असे.

गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची चळवळ करण्याचा निर्धार काँग्रेसने केला. 31 डिसेंबर 1929 रोजी रात्री 12:00 वाजता संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करण्यात आली. 26 जानेवारी 1930 हा दिवस भारताचा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचे ठरले. त्यादिवशी स्वातंत्र्याची प्रतिज्ञा केली. महात्मा गांधीनी पुन्हा लॉर्ड आयर्विन यांना पत्र पाठवून आपल्या मागण्या मान्य. करण्यासाठी आग्रह धरला. परंतु लॉर्ड अर्विन आणि त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाही. त्यामुळे साबरमती आश्रमात काँग्रेस कार्यकारिणीची बैठक घेऊन त्यात राष्ट्रीय स्तरावर सविनय कायदेभंगाची चळवळ चालविण्याचे निर्णय घेतला. या चळवळीत शासनाने पास केलेल्या कायद्याचे नम्रपणे विरोध करणे सत्याग्रहाच्या माध्यमातून अहिंसा मार्गाने कोणत्याही हिंसाचाराला अवलंब न करता शांततामय मार्गाने सरकारच्या अन्याय व जुलमी कायदेला विरोध करणे म्हणजे सविनय कायदेभंग. कायद्याचा भंग करणे. शेतसारा व सरकारची कर न भरणे. शाळा, महाविद्यालयांवर बहिष्कार घालणे. सरकारी समारंभ यावर बहिष्कार घालणे. परदेशी मालावर बहिष्कार घालणे.

जंगल कायद्याचा भंग करणे. गांधींनी कायदेभंग चळवळीचा एक कार्यक्रम म्हणून मिठाचा सत्याग्रह करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी दांडी यात्रा काढली. ही दांडी यात्रा महात्मा गांधींनी 12 मार्च 1930 ला आपल्या निव्वळ 80 सत्याग्रही समवेत साबरमती आश्रमातून पदयात्रेला चालत निघाले. साबरमतीहून 200 मैल 380 किलोमीटर अंतरावर असलेले दांडी येथे 5 एप्रिल 1930 रोजी पोहोचले. हे अंतर 14 दिवसात पार केले. तेथे गेल्यानंतर गांधीजींनी दांडी किनार्यावर मिठाचा कायद्याचा भंग करून मीठ उचलले इतर सत्याग्रही त्याचेच अनुकरण केले. आणि कायदेभंगाच्या चळवळीला शुभारंभ केला. अनेक नेत्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे धारावीतील सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांच्याकडे देण्यात आले. महात्मा गांधीचे नेतृत्व हे सामान्य जनतेपर्यंत पोहचले होते. अनेक सधन वर्गाचे सहकार्य आणि भारतीय महिलेचा सहभाग वाढला. मुस्लिम धर्मातील पठाण सहभागी झाले. शेतकरी वर्गाचा सहभाग वाढला. आणि विशेषता सामान्य जनतेमध्ये ब्रिटीशांच्या विरूद्धात. निर्भयता. निर्माण झाली. अहिंसा आणि सत्याग्रहाच्या मार्गाचा पुरस्कार करण्यात आला. गांधीच्या अहिंसा मार्गाने लोकचळवळ शहरांपुरती मर्यादा न राहता. देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचली. महात्मा गांधी खेड्यापर्यंत पोचले. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सर्व थरातील लोक डॉक्टर, वकील, कामगार, शेतकरी सर्व लोक उतरले. या चळवळीचे स्वरूप राष्ट्रव्यापी होते.त्यामुळे भारतातील जनआंदोलनाच्या तीव्रता कमी करण्यासाठी राजकीय सुधारणाचा करण्याचा ब्रिटिशांना गरजेचे वाटू लागले. गोलमेज परिषदांचे आयोजन केले गेले. भारतावरील सत्ता संपुष्टात आणून भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महात्मा गांधीजींने म्हटल्याप्रमाणे करू किंवा मरू या प्रेरणेने चलेजाव आंदोलन सुरू झाले. या आंदोलनात भारतातील ब्रिटिशांची सत्ता संपुष्टात येण्याचा, भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली. भारतात ब्रिटिशविरुद्ध प्रचंड असंतोष वाढला. भारतीयांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी ब्रिटिश सरकार क्रिप्स मिशन भारतात पाठविली. ब्रिटिशांनी कॉंग्रेसला जबाबदार धरले. 14 जुलै 1942 कॉंग्रेस कार्यकर्त्यांची बैठक वर्धा येथे भरविण्यात आली आणि त्या बैठकीमध्ये राष्ट्रीय आंदोलनाचे सर्व अधिकार महात्मा गांधीना देण्यात आले. आणि कार्यकारणीची देशातील राजकीय परिस्थितीवर गांभीर्याने विचार करून एक ठराव पास केला. बिटिश ताबडतोब हिंदुस्थान सोडून जावे. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामासाठी अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय घेणारे कॉंग्रेसचे अधिवेशन सात ऑगस्ट 1942 रोजी ग्वालियर क्रांती मैदान. मुंबई येथे सुरू झाले. मौलाना अब्दुल कलाम आझाद अध्यक्ष होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी छोडो भारत ठराव मांडला. आणि त्याला वल्लभभाई पटेलांनी अनुमोदन दिले. जनसमुदाय 1000 होता. उपस्थितांना महात्मा गांधी सांगितले की, “मी अधिक काळ स्वातंत्र्यासाठी वाट पाहू शकत नाही. त्यासाठी मी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला. माझ्या जीवनातील हा शेवटचा संघर्ष असे. आम्ही आता अधिक ब्रिटिशांच्या गुलामगिरी राहू शकत नाही. त्यासाठी सर्वशक्तिनिशी सरकारशी लढा द्यावा लागेल” त्याचवेळी त्याने जनतेला “करा किंवा मरा” असा संदेश दिला. ब्रिटिशांनी भारत सोडून तात्काळ निघून जावे अशी घोषणा महात्मा गांधीनी केली. सरकारने जरी त्याना तुरुंगात टाकले तरी प्रत्येक भारतीय आणि आपण सत्ता चालत आहोत असे समजून निर्धाराने पुढे चालवावा असा संदेश गांधीनी जनतेला दिला होता. महात्मा गांधीजी स्वातंत्र्य लढ्यासाठी सतत झटत राहिले.

## सारांश

2 आक्टोबर 1869 मध्ये गुजरातमध्ये जन्मलेल्या गांधींनी लंडनमधील इनर टेंपलमध्ये कायद्याचे शिक्षण घेतले. भारतात सराव करण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर, ते 1893 मध्ये दक्षिण आफ्रिकेत गेले, जेथे ते 21 वर्षे राहिले. दक्षिण आफ्रिकेतच गांधींनी प्रथम नागरी हक्कांसाठी मोहिमेसाठी अहिंसक प्रतिकाराची युक्ती वापरली. अशा कालखंडात महात्मा गांधींच्या सत्याची प्रस्तुतता काय? सत्य म्हणजे खरे बोलणे किंवा खोटेपणा, फसवणूक यांपासून दूर राहणे, असा

अर्थ आपण घेतो. मात्र गांधींची सत्याची कल्पना ही निव्वळ खरे बोलण्याने साकार होत नाही. त्यात जीवनाविषयीचा सखोल दृष्टिकोन आहे. गांधींना “महात्मा” आणि “राष्ट्रपिता” म्हणूनही ओळखले जाते. रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांना “महात्मा” ही पदवी बहाल केली होती. गरिबी कमी करणे, महिलांचे अधिकार वाढवणे, धार्मिक सौहार्द निर्माण करणे या राष्ट्रव्यापी मोहिमांचे नेतृत्व करताना, गांधींनी अहिंसक सत्याग्रह तत्त्वे सर्वोच्चपणे लागू केली आणि भारताला परकीय वर्चस्वापासून मुक्त करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**संदर्भ सूची**

१. बापूंची पत्रे काका कालेलकर नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
२. गांधी विचार दर्शन. खंड ५.७. बाळासाहेब भारदे. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीपुणे.
३. गांधीची पत्रे. महात्मा गांधी
४. विधायक कर्यक्रम त्यांचे रहस्यव स्थान महात्मा गांधी
५. ग्राम. सेवा महात्मा गांधी.
६. आरोग्याची किली. महात्मा गांधी.
७. संयम कि स्वचार भाग १. २. – महात्मा गांधी.
८. संपूर्ण स्वदेशी – महात्मा गांधी
९. माझ्या स्वप्नातील भारत – महात्मा गांधी
१०. मंगल प्रभात. महात्मा गांधी.